सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय ,नाशिक,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)**

**दुरध्वनी क्र.** 0253-2315080/2317151 E-Mail- ddmanashik@gmail.com **फॅक्स क्र.**0253- 2581700

**क्र. कक्ष/कोरोना विष्णाणू/133/2020** **दि. 23/03/2020**

**वाचा :** 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30, 33, 34,41 व कलम 51

2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे कडील अधिसूचना क्र. करोना 2020 /प्र.क्र. 58 आरोग्य 5 दिनांक 13 मार्च 2020

3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे कडील अधिसूचना क्र. प्र.क्र. 58 आरोग्य 5 दिनांक 14 मार्च 2020

आदेश

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

ज्या अर्थी राज्य शासनाने संदर्भीय 2 अन्वये करोना विषाणूचा ( कोव्हीड 19 ) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करून खंड 2,3,व 4 मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय 3 अन्वये प्रसिद्ध केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय 2 अन्वये प्रसिद्धी केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

ज्या अर्थी करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी पार्श्वभूमीवर परस्पर संपर्कामुळे या विषाणूचा संसर्ग व प्रसार होण्याची शक्यता लक्षात घेता मानवी जिवीताला, आरोग्याला किंवा सुरक्षितेला संकट उत्पन्न होऊ शकते याची माझी खात्री झालेली आहे, यापुर्वी नागरीकांनी कामाशिवाय घराच्या बाहेर पडु नये. असे वारंवार आदेशीत करुनही रस्त्याने नागरीक वाहनाने ये-जा करत आहे. सबब नाशिक जिल्हयामध्ये पेट्रोल-डिझेल विक्री केंद्रावर ग्राहकांना पेट्रोल व डिझेल विक्री करणेबाबत निर्बंध घालणे आवश्यक झाले आहे. यापार्श्वभूमीवर राज्य शासनाचे संदर्भिय 01 व 02 अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी सुरज मांढरे, जिल्हाधिकारी, नाशिक जिल्ह्यामधील सर्व पेट्रोल व डिझेल विक्री केंद्रासाठी असा आदेश देत आहे की, उपरोक्त केंद्राचे वितरक यांनी दुचाकीसाठी 24 तासासाठी 100 रु. आणि चारचाकी वाहनासाठी 1000 रु. एवढयाच किंमतीचे पेट्रोल व डिझेल वितरीत करावे. सदर आदेश हे दिनांक 23 मार्च 2020 पासून दि. 31 मार्च, 2020 पर्यंत अंमलात राहतील.

उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 व भारतीय दंडसंहिता 1860 (45) याच्या कलम 188 शिक्षेसपात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल आणि पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**(सुरज मांढरे, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**

**प्रति -** 1. मा. पोलीस आयुक्त, शहर पोलीस , नाशिक माहितीस्तव सविनय सादर

2. पोलीस अधीक्षक, ग्रामीण पोलीस ,नाशिक माहितीसाठी

3. जिल्हा पुरवठा अधिकारी यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी

4. व्यवस्थापक हिंदुस्तान पेट्रोलियम/ भारत पेट्रोलियम/इंडियन ऑईल योग्य त्या कार्यवाहीसाठी

**प्रत-** 1. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर

2. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई 32 यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.